दि. १५/०४/२०२४.

१) लोकसत्ता ५१९ नं. ०४.

# मुलीवरील अत्याचारानंतर मिरा रोडमध्ये तणाव

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** चार वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचाराची घटना घडल्यानंतर रविवारी मीरा रोडमध्ये तणाव निर्माण झाला होता. संतप्त जमावाने आरोपीच्या दुकानाची मोडतोड करत आरोपीला पोलिसांच्या स्वाधीन केले.

मिरा रोडमध्ये पीडित मुलीच्या शेजारी राहणाऱ्या एका विक्रेत्याने मागील आठवड्यात तिच्यावर लैंगिक अत्याचार केला होता. धार्मिक संघटनांनी आरोपी विक्रेत्याला मारहाण केली. पोलिसांनी आरोपीवर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

२) लोकमत पृ. ५१९ नं. ०९.

## मोबाइलवर चित्रपट पाहताना झटका; तरुणाचा मृत्यू

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मीरारोड :** भाईंदरच्या उत्तन - नवी खाडी येथे राहणारे दिलीप रोड्रिक्स हे मच्छीमार आहेत. मासेमारीसाठी त्यांच्याकडे झारखंड राज्यातून आलेले खलाशी घराच्या गच्चीवर राहतात. १२ एप्रिलच्या मध्यरात्रीच्या सुमारास झारखंडच्या गिरिडीह येथील मूळचा असलेला खलाशी सिकदर हरो कोल (३२ वर्षे) हा गच्चीवर मोबाइलमध्ये चित्रपट पाहत होता.

अचानक त्याला झटका आला. त्याला पंडित भीमसेन जोशी शासकीय रुग्णालयात पहाटे ५ च्या सुमारास नेले असता डॉक्टरांनी तपासून त्याचा मृत्यू झाला असल्याचे घोषित केले.

# वेश्याव्यवसाय चालवणारी महिला दलाल अटकेत

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मीरारोड :** वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या एका महिलेस मीरा भाईंदरच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेने सापळा रचून अटक केली आहे.

शाखेचे पोलिस निरीक्षक समीर अहिरराव व पथकाने मिळालेल्या माहितीनुसार बोगस गिऱ्हाईकामार्फत सापळा रचला. मीरारोड रेल्वे स्टेशन बाहेरील शांतीसागर हॉटेल जवळ अंधेरीच्या मॅरिलिन इमारतीत राहणारी आरती हरीश टाक (३२, मूळ रा. हरियाणा) ही एका २८ वर्षीय नेपाळी तरुणीला वेश्याव्यवसायासाठी घेऊन आली होती.



टाक हिने बोगस गिऱ्हाईकामार्फत रक्कम स्वीकारताच पोलिसांनी तिला ताब्यात घेतले. तिच्यावर १३ एप्रिल रोजी रात्री नयानगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिच्याकडून २ मोबाइल, रोख आदी ५४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक विलास सुपे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पोलिस निरीक्षक मंगेश कड हे तपास करत आहेत.

Scanned with OKEN Scanner

CamScanner

दि. १५/०४/२४.

(३) लोकमत पृ. ५१ नं. ०१

# सीएनजीसाठी महामार्गावर पुन्हा रिक्षांच्या रांगा

## वाहनांना अडथळा : अपघाताची भीती



महामार्गालगत तुंगार फाटा येथील पेट्रोल पंपावर सीएनजी गॅस भरण्यासाठी मोठ्या संख्येने रिक्षा व इतर वाहने येतात. या वाहनांच्या रांगा लागतात.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** मुंबई-अहमदाबाद महामार्गावर पुन्हा एकदा सीएनजी गॅस भरण्यासाठी रिक्षांच्या रांगा लागत आहेत. मुख्य रस्त्यांवर या रांगा लागत असल्याने अपघात होण्याची शक्यता आहे. रिक्षांच्या रांगामुळे वाहने ये-जा करण्यास अडथळे निर्माण होत आहेत.

महामार्गालगतच तुंगार फाटा येथील पेट्रोल पंपावर सीएनजी गॅस भरण्यासाठी मोठ्या संख्येने रिक्षा व इतर वाहने येतात. या वाहनांच्या रांगा महामार्गावर येतात.

### विरुद्ध दिशेने प्रवास, कारवाईची मागणी

महामार्गावर आधीच व्हाइट टॉपिंगच्या कामामुळे नागरिक त्रस्त आहेत. त्यातच रिक्षांच्या रांगा लागत आहेत; यामुळे रस्ता अरुंद होत असून कोंडी होत असल्याचे नागरिकांनी सांगितले. काही रिक्षा विरुद्ध दिशेनेही येत असतात. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. वाहतूक विभागाने याकडे लक्ष देऊन यावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते देवीदास केंगार यांनी केली आहे.

(४) लोकमत पृ. ५१ नं. ०१.



# ग्रुपमध्ये ॲड केले अन् शेअरच्या नावाने फसविले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेला राहणाऱ्या एका तरुणाला ग्रुपमध्ये ॲड करून त्याला शेअरद्वारे फायदा करून देण्याचे आमिष दाखवत त्याची फसवणूक झाली आहे.

पद्मावतीनगर, शंकेश्वर इमारतीत राहणारे रिंकेश देवराज कोठारी (३६) यांना अनोळखी व्यक्तीने व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये ॲड केले. शेअर मार्केटमध्ये त्यांच्या माध्यमातून पैसे गुंतविल्यास भरपूर फायदा करून देण्याचे आमिष दाखवले असता, त्या आमिषाला बळी पडून कोठारी यांनी २ लाख ५० हजार रुपये गुंतविले. त्या रकमेवर त्यांना १२ लाख ५० हजार रुपयांचा फायदा झाल्याचे भासविण्यात आले, परंतु फायदा झालेली रक्कम काढता येत नव्हती व त्यासाठी आणखी पैशांची मागणी अनोळखी व्यक्ती करत होते. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर कोठारी यांच्या फिर्यादीवरून उत्तन सागरी पोलिसांनी १२ एप्रिल रोजी अनोळखी व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सायबर लुटारू ऑनलाइन फसवत असल्याने अनोळखी व्यक्तींना प्रतिसाद देऊ नका, असे वारंवार आवाहन करूनही पैशांच्या लोभाने लोक फसवणुकीचे बळी ठरत आहेत.

(५) लोकमत पृ. ५१ नं. ०१

# अल्पवयीन मुलीचे अपहरण



**नालासोपारा :** शिर्डीनगर भीम डोंगरी परिसरात राहणाऱ्या १५ वर्षांच्या मुलीचे शनिवारी दुपारी अपहरण झाल्याची घटना घडली आहे. घरात तिची आई झोपलेली असताना काहीही न सांगता ती मुलगी निघून गेली व परतली नाही. आरोपीने तिला कशाचे तरी आमिष दाखवून पळवून नेले आहे. मुलीच्या आईने आचोळे पोलिस ठाण्यात तक्रार देऊन अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with OKEN Scanner

CamScanner

## धूमस्टाईलने चेनचोरी

नालासोपारा : वालीवच्या फरशी वाडी समोरील मातोश्री बंगल्यात राहणारे बांधकाम व्यावसायिक प्रशांत पायगांवकर (४२) यांच्या गळ्यातून सोन्याची चेन खेचून नेल्याची घटना घडली आहे. ते ९ एप्रिलला रात्री १० वाजण्याच्या सुमारास गोलानी नाक्याजवळील वरुण इंडस्ट्री येथील शैरिन एन्टरप्रायजेस कंपनीच्या समोरील रस्त्यावर गाडी उभी करून मोबाइलवर बोलत होते. त्यांच्या पाठीमागून आलेल्या दुचाकीवरील दोन चोरट्यांपैकी एकाने त्यांच्या गळ्यातून ३ लाख रुपये किमतीची सोन्याची चेन खेचून नेली आहे. वालीव पोलिसांनी शनिवारी जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## ब्रेक मारल्याने दुचाकी घसरून तरुणीचा मृत्यू

मीरारोड : भाईंदर पश्चिमेच्या धर्मेंद्र विलामध्ये राहणारा हर्ष चेतन शाह (२४) हा शिक्षण घेत असून १२ एप्रिल रोजी तो मैत्रीण फोरम चंद्रेश शाह हिला दुचाकीवरून घेऊन चालला होता. भाईंदर पूर्वेकरून मेडतीया नगर येथे आले असता दुचाकीला शाह याने अचानक ब्रेक मारल्याने दुचाकी घसरून दोघेही पडले. त्यात फोरम हिला गंभीर मार लागून तिचा मृत्यू झाला. नया नगर पोलिसांनी या प्रकरणी हर्ष शाहवर गुन्हा दाखल केला आहे. सहायक पोलिस निरीक्षक मंगेश कड हे तपास करत आहेत.

## उपचारादरम्यान जखमीचा मृत्यू

नालासोपारा : हनुमाननगरच्या जय हॅरिटेज अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या अनिकेत खाखोडिया (१८) या जखमी तरुणाचा हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. त्याचा ५ एप्रिलला संध्याकाळी दुचाकी चालविताना अपघात झाला होता. त्याला उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आले होते. शनिवारी त्याचा मृत्यू झाला असून, आचोळे पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

## भिवंडीच्या मजुराचा भाईंदरमध्ये मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भिवंडीच्या अंबाडी रोड येथील अंबड दुगाडगाव येथे राहणारा साईनाथ मधुकर इंदे (२८) हा गेल्या एक महिन्यापासून भाईंदरच्या उत्तन भागात मजुरी काम करत होता. सोमनाथ हा भाईंदरच्या पंडित भीमसेन जोशी सरकारी रुग्णालयाजवळ पडून आहे, अशी माहिती त्याचा मित्र पांडू वागे (रा.किरवली) याने साईनाथची पत्नी दर्शना हिला दिली. दर्शना हिने आजूबाजूच्या लोकांच्या मदतीने साईनाथ याला रुग्णालयात नेले असता, डॉक्टरांनी तपासून त्याचा आधीच मृत्यू झालेला असल्याचे जाहीर केले. या प्रकरणी १२ एप्रिल रोजी उत्तन सागरी पोलिसांनी दर्शना हिच्या माहितीवरून आकस्मिक मृत्यूची नोंद करत या घटनेचा तपास सुरू केला आहे.

## डोके फोडणाऱ्या बाप-लेकावर गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : सुरू असलेल्या भांडणात मध्ये येऊन मारहाण करणाऱ्या दोघांविरोधात गुन्हा दाखल झाला.

मीरागावठाणमधील भुजंड चाळ येथे राहणारे निलेश प्रकाश काळे (३१) यांचे त्यांचा मामेभाऊ आशिष याच्यासोबत भांडण सुरू होते. त्यावेळी संतोष प्रधान आणि त्याचा मुलगा बंटी या दोघांनी येऊन काळे याला लाकडी बांबू आणि लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी केले. त्याचे डोके फोडले. काळे यांच्या फिर्यादीनुसार १३ एप्रिल रोजी काशीमीरा पोलिसांनी प्रधान बाप लेका वर गुन्हा दाखल केला आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

Scanned with OKEN Scanner
CS CamScanner

दि. १५/०४/२४.

(१९) लोकमत पृ. ५ दि. १५.०४

# बोलण्यात गुंतवून वृद्धास लुटले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेच्या ९० फुटी मार्गावर चिरंजीव एन्क्लेव्ह इमारतीसमोर एका अनोळखी इसमाने ६७ वर्षीय प्रमोद दौलत पवार यांना बोलण्याच्या बहाण्याने गुंतवले. हातचलाखीने व लबाडीने त्या अनोळखी व्यक्तीने पवार यांच्या हातातील दोन सोन्याच्या अंगठ्या व चार हजार रोख असा २२ हजारांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी १३ एप्रिल रोजी भाईंदर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. वरिष्ठ निरीक्षक सूर्यकांत नाईकवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रसाद गोवले हे तपास करत आहेत.

(२०) लोकमत पृ. ५ दि. १५.०४

# ज्वेलर्समध्ये खरेदीला आले, मंगळसूत्र चोरले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या स्नेहा हॉस्पिटलसमोर अंकित सिंघवी यांचे मंगलम ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. या दुकानात खरेदीच्या बहाण्याने आलेल्या तीन अनोळखी व्यक्तींनी लबाडीने दुकानातील सुमारे १४ ग्रॅम वजनाचे आणि ८६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेले. सिंघवी यांच्या फिर्यादीवरून नवघर पोलिसांनी १३ एप्रिल रोजी तीन अनोळखी चोरट्यांवर गुन्हा दाखल केला असून वरिष्ठ पोलिस निरीक्षक धीरज कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार सुरेश चव्हाण हे तपास करत आहेत.

(२१) सामना ५ दि. १५.०४.

**दोन फ्लॅट एकत्र करण्यासाठी केलेली तोडफोड जीवावर बेतली**

# भाईंदरमध्ये इमारतीचा स्लॅब कोसळून दोन कामगार ठार



**भाईंदर, दि. १४ (प्रतिनिधी) –** दोन फ्लॅट एकत्र करण्यासाठी सुरू असलेली तोडफोड दोन कामगारांच्या जीवावर बेतल्याची घटना भाईंदर पूर्व भागातील श्रीनाथ ज्योती इमारतीमध्ये घडली. इमारतीचे मुख्य स्ट्रक्चर तोडले जात असताना अचानक स्लॅब आणि एक भिंत कोसळली. त्याखाली चिरडून दोन कामगारांचा जागीच मृत्यू झाला तर एक कामगार गंभीर जखमी झाला. याप्रकरणी नवघर पोलिसांनी घरमालकाच्या विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे.

भाईंदर पूर्वेला वेणू नगर येथे तळ अधिक पाच माजल्याची श्रीनाथ ज्योती इमारत आहे. या इमारतीच्या तळ मजल्यावर दोन सदनिका एकत्र करण्यासाठी मालक डॉ.विनयकुमार त्रिपाठी यांनी तोडफोड सुरू केली होती.भिंती व बाथरूम पोर्चचा स्लॅब तोडून काढत असताना अचानक स्लॅब आणि भिंत कोसळली. या दुर्घटनेत हरिराम चौहान (५५) आणि मखनलाल यादव (२६) हे दोघे जबर जखमी होऊन जागीच मरण पावले. आकाशकुमार यादव हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर नजीकच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## कारवाईनंतरही काम सुरूच ठेवले

पालिकेने कारवाई केल्यानंतर घराचे मालक त्रिपाठी यांनी बेकायदेशीररीत्या काम चालू ठेवले. महापालिकेला सुट्टी असल्याचा फायदा घेऊन दोन सदनिकेच्या आत असलेल्या भिंती तोडून टाकल्या. स्लॅब आणि भिंत कोसळल्यानंतर प्रशासनाची एकच पळापळ उडाली. पालिका आयुक्त संजय काटकर यांनी या घटनेचा आढावा घेतला. सहाय्यक आयुक्त जितेंद्र कांबळे यांच्या फिर्यादीवरून नवघर पोलीस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा व अनधिकृत बांधकामप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी नवघर पोलिसांनी आरोपी विनयकुमार त्रिपाठी यांना ताब्यात घेतले असून पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक धीरज कोळी हे करत आहेत.

Scanned with OKEN Scanner

CamScanner

दि. १५/०४/२५.

(१३) सामना पा.क्र.०५.

## हेरॉईन जप्त

भाईंदर : गर्द पावडरची विक्री करण्यासाठी आलेल्या दोघांना भाईंदर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. गौतम गुप्ता व सचिन गुप्ता उर्फ बाटला अशी या दोघांची नावे आहेत. हे दोघेही भोलानगर परिसरातील मुकुंदम इमारतीजवळ हेरॉईन विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या दोघांना अटक करून त्यांच्याकडून रिक्षा आणि १८ ग्रॅम गर्द पावडर असा ५ लाख ६१ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

(१४) सकाळ पृ.पा.क्र.०४

# चोरीतील ९३ लाखांचा काजू जप्त करण्यात यश

### मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांची कारवाई

विरार, ता. १४ (बातमीदार) : कर्नाटकमधील कंपनीतून गुजरातसाठी पाठवलेला लाखो रुपयांचा काजू परस्पर लंपास करण्यात आला होता. या गुन्ह्याचा छडा मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने लावून ९३ लाखांचा काजू नालासोपारा येथील व्यापाऱ्याकडून हस्तगत करण्यात आला.

कर्नाटकमधील उडपी येथील मोहनदास शेट्टी यांच्या फॅक्टरीतून २ एप्रिल रोजी कंपनीने एक कोटी २१ लाख ७६ हजार रुपयांचा काजू सुरत आणि अहमदाबाद येथील व्यापाऱ्यांकडे ट्रकमधून पाठवला होता. मात्र, काजू संबंधित व्यापाऱ्यांना पोचला नसल्याने शेट्टी यांच्या तक्रारीवरून उडपी येथील पोलिस ठाण्यात तीन जणांविरोधात गुन्हा दाखल होता. याप्रकरणी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या गुन्हे मध्यवर्ती शाखेच्या पथकाला नालासोपाऱ्यातील एका व्यापाऱ्याकडे चोरीचा काजू आल्याची माहिती खबऱ्याने दिली होती. त्यांनी अधिकची माहिती घेत येथील व्यापाऱ्याला ताब्यात घेतले. त्याने चोरीचा काजू खरेदी केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी नालासोपारा आणि नवी मुंबईतील वाशी येथे लपवून ठेवलेला ९२ लाख ७० हजारांचा काजूचा साठा जप्त केला.

(१५) सकाळ पृ.पा.क्र.०४.

# खासगी टँकरवाल्यांना चाप

## मिरा-भाईंदरमध्ये पाणी गुणवत्ता अहवाल सादर करण्याचा आदेश

भाईंदर, ता. १४ (बातमीदार) : मिरा-भाईंदरमधील खासगी टँकरद्वारे पुरवल्या जाणाऱ्या पाण्याची गुणवत्ता न राखणाऱ्या टँकर मालकांवर महापालिकेकडून कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. खासगी टँकरद्वारे नागरिकांना दूषित पाणीपुरवठा होण्याची शक्यता असल्याने महापालिका प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे. टँकरमालकांना ते पुरवत असलेल्या पाण्याचा गुणवत्ता अहवाल सादर करण्याचे आदेश महापालिकेने दिले आहेत, मात्र एकाही टँकर मालकाने महापालिकेला अहवाल दिलेला नाही. त्यामुळे त्यांच्यावर टँकर बंदीसारखी कारवाई केली जाणार आहे.

मिरा-भाईंदर शहरात अनेक खासगी टँकर कार्यरत आहेत. दहा हजार लिटरपासून ते अगदी तीनचाकी छोट्या वाहनांवर बसवलेले सातशे ते हजार लिटरच्या टँकरचा त्यात समावेश आहे. मिरा-भाईंदर शहरात आजही नागरिकांना पुरेसे पाणी उपलब्ध नाही. दररोज ३० ते ३५ तासांनी पाणी उपलब्ध होते. अनेक वेळा शटडाऊनमुळे अथवा जलवाहिनी




खंडित झाल्यामुळे पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक ७२ तासांवर जाते. अशावेळी नागरिक मोठ्या प्रमाणावर खासगी टँकर मागवत असतात.

खासगी टँकर मालकांच्या स्वतःच्या विहिरी, बोअरवेल अथवा तलाव आहेत किंवा दुसऱ्या खासगी विहिरीतूनही ते पाणी भरून मागणीनुसार पुरवठा करतात, मात्र त्यांच्या पाण्याच्या गुणवत्तेबाबत कोणतीही खात्री नसते. हे पाणी पिण्यायोग्य आहे की नाही, याची कोणतीही तपासणी केलेली नसते. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला अपाय होऊ शकतो. यासाठी महापालिकेने शहरातील खासगी टँकरने पाणीपुरवठा करणाऱ्यांचे नुकतेच सर्वेक्षण केले. त्यानुसार काही खासगी टँकरमालक शोधून काढण्यात आले आहेत. या सर्वांना महापालिकेने पत्र पाठवून ते पुरवत असलेल्या पाण्याच्या गुणवत्तेचा अहवाल सादर करण्यास सांगितले होते. मात्र यापैकी एकानेही अद्याप अहवाल सादर केलेला नाही. त्यामुळे या सर्वांवर कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे.

### महापालिकेची कारवाई




शहरातील सर्व खासगी टँकरचालकांना पाण्याचा गुणवत्ता अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत, मात्र एकानेही अहवाल दिलेला नाही. आता टँकरमालकांना पुन्हा अंतिम नोटिसा बजावण्यात येतील व त्यानंतरही अहवाल आले नाहीत तर टँकरवर बंदी घालण्याची कारवाई केली जाईल.

- दीपक खांबित, शहर अभियंता, मिरा-भाईंदर महापालिका

### पाणीकपातीमुळे धंदा तेजीत

आता उन्हाळा सुरू झाला असल्याने या टँकरची मागणी वाढू लागली आहे. त्यातच पाणीकपात लागू झाल्यास या टँकर मालकांचे उखळ पांढरे होणार आहे. हे टँकरमालक साडेतीनशे रुपयांपासून ते एक हजार रुपयांपर्यंतचे शुल्क आकारतात. दुसरीकडे महापालिकेकडूनही टँकरद्वारे पाणी पुरवले जाते, मात्र ज्या इमारतींना नळ जोडणी दिलेली नाही, अशा ठिकाणी अथवा झोपडपट्टी परिसरात ते दिले जातात. मात्र हे पाणी शुद्ध स्वरूपातील असल्यामुळे ते पिण्यायोग्य असते

Scanned with OKEN Scanner

CamScanner

दि.१५/०४/२४.

(१७) लोकमत पान नं.०८

# चिमुरडीवर अत्याचारानंतर दुकानांची केली तोडफोड

## भाईंदरमधील घटना; पोलिस ठाण्यात गोंधळ

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** नवघर पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका चार वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचार केल्याच्या प्रकरणास धार्मिक वळण लागून जमावाने रविवारी रात्री पोलिस ठाण्यात गोंधळ घालत परिसरातील काही दुकानांची तोडफोड केली. शहरात तणावाचे वातावरण असून, मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

मीरा रोड भागातील एका दुकानदाराने साडेतीन ते चार वर्षांची चिमुरडी खेळण्यासाठी आली असता, तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. ७ एप्रिल रोजी ही संतापजनक घटना घडली होती. हा प्रकार रविवारी समोर आल्यानंतर दुकानाची तोडफोड करून दुकानचालकास जमावाने मारहाण करत नवघर पोलिस ठाण्यात आणले. आमदार गीता जैन, भाजपचे स्थानिक नेते ॲड. रवी व्यास आदी पोलिस ठाण्यात दाखल झाले.

### आरोपीला अटक, कारवाईचे आश्वासन

- पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली; परंतु रात्री उशिरापर्यंत जमाव पोलिस ठाण्यात व परिसरात घोषणा देत होता व आरोपीला आमच्या ताब्यात द्या, अशी मागणी करत होता. आ. प्रताप सरनाईक, पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड हे पोलिस ठाण्यात जमावाला शांत राहण्याचे आवाहन करत होते.
- आरोपीला अटक केल्याचे सांगत कठोर कारवाईचे आश्वासन देऊनही जमाव ऐकत नव्हता. काही जणांनी चार ते पाच दुकानांची तोडफोड केली. त्यामुळे पोलिसांनी सौम्य लाठीमार करत जमावाला पांगविले.
- याप्रकरणी तत्काळ गुन्हा दाखल करून आरोपीला अटक करा, अशी मागणी आ. जैन व व्यास यांनी केली

(१८) महाराष्ट्र टाईम्स पान नं.१०.

# गोळीबारप्रकरणी सरकारवर टीका

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई



अभिनेता सलमान खान याच्या निवासस्थानाबाहेर रविवारी सकाळी अज्ञातांकडून करण्यात आलेल्या गोळीबाराचे पडसाद दिवसभर राजकीय क्षेत्रातही उमटले. या प्रकरणावरून विरोधी पक्षाने राज्य सरकारवर टीकास्त्र सोडले असून ट्रिपल इंजिन सरकारमधील कोणाचा तरी आशीर्वाद असल्याशिवाय हे होऊ शकणार नाही, असा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला. तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे राज्यसभेचे खासदार संजय राऊतही यांनीही राज्यात कायदा आणि सुव्यवस्था उद्ध्वस्त झाली आहे, अशी टीका केली. दरम्यान, या सर्व प्रकरणानंतर कोणत्याही प्रकारे गुन्हेगारांना पाठीशी घालण्यात येणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

सलमान खान याच्या निवासस्थानाबाहेर पहाटे रविवारी अज्ञात व्यक्तींनी पाच फैरी झाडल्या. सलमान खान हा राजस्थानातील काळवीट शिकार प्रकरणानंतर बिश्नोई गँगच्या हिटलिस्टवर आहे. या गँगच्या गुंडांकडूनच हा गोळीबार करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांनी सरकारला लक्ष्य केले. 'हा गोळीबार भरवस्तीत झाला आहे. 'अब की बार गोळीबार सरकार' यावर यामुळे शिक्कामोर्तब झाले आहे. सरकारमध्ये कोणाचा तरी गुन्हेगारीला आशीर्वाद आहे. त्याशिवाय कसे हे शक्य होते,' असा प्रश्न सुळे यांनी केला.

मी स्वतः पोलिस आयुक्तांशी बोललो आहे. सलमान खान यांच्याशीही बोललो त्यांना दिलासा दिला आहे. कायदा हातात घेणाऱ्यांना पाठीशी घातले जाणार नाही. या प्रकरणी पोलिस कठोर कारवाई करतील, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील, पोलिस तपास करत आहेत असे सांगितले.

Scanned with OKEN Scanner
CamScanner

दि. १५/०४/२४

(७) महाराष्ट्र टाईम्स पुरवणी पान नं ०७.

# साडेचार लाखांचे अमली पदार्थ जप्त



**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

भाईंदरच्या भोला नगर परिसरातून साडेचार लाखांचे हेरॉईन जप्त करण्यात आले असून, या प्रकरणी दोन जणांना अटक करण्यात आली आहे. भाईंदर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण लथकाने ही कारवाई केली आहे.

भाईंदर पोलिसांचे पथक भोला नगर परिसरात गस्त घालत असताना जेपी इन्फ्रा गृहप्रकल्पाजवळ उभ्या असलेल्या एका रिक्षात चालक गौतम गुप्ता व सचिन गुप्ता असे दोघे जण त्यांना संशयास्पदरित्या दिसून आले. पोलिसांनी त्यांची अंगझडती घेतली असता, गौतमच्या चोरखिशात १८ ग्रॅम हेरॉईन सापडले. दोघांनाही अटक करीत त्यांच्यावर विविध कलमाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे अमली पदार्थ विक्रीसाठी आणण्यात आला होता का याबाबत तपास सुरू असल्याचे भाईंदर पोलिसांनी सांगितले.

Scanned with OKEN Scanner

CamScanner